जगभर

अहिंसा व हिंसा : चीनमधील संत व इराकमधील मोसूल

चन्द्रशेखर पुरन्दरे

सत्तेला सत्य सांगण्याची किंमत

काही मूल्ये कालातीत असतात हे सत्ताधीशांना वारंवार सांगणे आवश्यक असते. त्यांना अर्थातच हे पटत नाही, लोकांनाही हा राजद्रोह वाटतो. मग अशा व्यक्तीचा छळ करणे राजवटीला सोपे जाते. अलिकडे म्यानमारच्या आंग सन सू ची, आधीच्या सोविएत युनियनमध्ये आंद्राय साखारोव, दक्षिण आफ्रिका देशातील नेल्सन मंडेला या अशा व्यक्ती. त्या दमनकारी धोरणांविरुद्ध सतत अहिंसक निषेध करत राहिल्या. शेवटी राजवटी बदलल्या (त्याही श्रेयस्कर दिशेने बहुधा नाहीच!) पण या व्यक्ती ज्यांच्या स्मरणात राहिल्या त्यांना आदरणीय झाल्या.

लिऊ झियाबो (Liu Xiaobo) हा चीनच्या राजवटीचा विरोधक या परंपरेतला. तो स्वत: साहित्यिक आणि तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर. अनेक विदेशी विद्यापीठांत तो अतिथी प्रोफेसर होता. १९८९ ला चीनमध्ये बीजिंगच्या तिआनमन चौकात विद्यार्थांनी लोकशाहीच्या मागणीसाठी प्रचंड निदर्शने केली. त्यांना पाठिंबा म्हणून तो चीनला परत आला व तेथे हजर होता. देंग झिआओ राजवटीने या विरोधकांवर रणगाडे घातले. ते मोठेच हत्याकांड होते. विशेष म्हणजे, त्या धामधुमीत अधिक विद्यार्थ्यांचा बळी जाऊ नये म्हणून लिऊ तेथे उपोषणाला बसला, त्याने लष्कर व संतप्त विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. अनेक विद्यार्थी त्या जोशात बलिदान करायला तयार होते. पण त्याने विद्यार्थांना परत जाण्यास पटवले. लिऊच्या हस्तक्षेपाअभावी गेले त्याहून अधिक बळी गेले असते.

मग सरकारी ससेमिरा लिऊच्या मागे लागला. १९८९ पासून या वर्षी त्याच्या अंतापर्यंत तो अनेक खोट्या आरोपांखाली तुरुंगात येऊन जाऊन असे. चीनमध्ये एक-पक्षीय एकाधिकारशाहीऐवजी खुली निर्वाचित लोकशाही असावी, आचार-विचार-प्रसार स्वातंत्र्य असावे, न्यायव्यवस्था पारदर्शी असावी, इ. त्याचा आग्रह राजवटीला पसंत नव्हता. तशा समविचारी तीनशेहून अधिक बुद्धिजीवींनी २००८ मध्ये 'charter 08' या नावाने अशा मागण्यांची पत्रिका प्रसृत केली. ती अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्याच्या दोन दिवस आधी लिऊला परत एकदा अटक करण्यात आली. इंटरनेटवरून ही पत्रिका हलवण्यात आली. २००९ला राजद्रोहाबद्दल त्याला ११ वर्षांचा तुरुंगवास देण्यात आला.

या काळातील आंतरराष्ट्रीय वातावरण लक्षात घेतले पाहिजे. चीनची अर्थव्यवस्था जागतिक व्यापाराला ८० च्या दशकात अधिक खुली झाली. त्या व्यापाराच्या लोभाने चीनच्या अंतर्गत विरोधकांच्या दमनाकडे पश्चिमेने धोरणाने दुर्लक्ष केले. मग १९८९ला वर उल्लेख केलेली तिआनमन कत्तल झाली. तोपर्यंत सोविएत युनियनचे विघटन होत होते, ती घटना पश्चिमेला तेव्हा चीनपेक्षा महत्त्वाची वाटली. तिआनमन निषेधांच्या दडपणुकीच्या विरोधात पश्चिमेत जनमतही तयार होत होते. मग आपल्या लोकांना खुश ठेवण्यासाठी याचा निषेध होऊ लागला. मानवी हक्कांचा कळवळा अर्थकारण ठरवते. १९९० नंतर परत चीनची आर्थिक ताकद वाढू लागली. ती आज एवढी आहे, की चीनला दुखावणे परवडणारे नाही. अर्थातच विरोधक परत जगाच्या प्राधान्यक्रमावरून घसरले.

दरम्यान लिऊला २०१०चा नोबेल पुरस्कार मिळाला. हे पारितोषिक मिळवणारा तो एकमेव चिनी. चिनी राजवटीला हा पश्चिमेचा खोडसाळपणा वाटला. पुरस्काराच्या आधीही नॉर्वे या पुरस्कार देणाऱ्या देशावर तो देऊ नये म्हणून चीनने दडपण आणले. त्याला पारितोषिक घ्यायला प्रत्यक्ष हजर राहू दिले गेले नाही. त्या कार्यक्रमात त्याच्या अनुपस्थितीत एक रिकामी खुर्ची ठेवण्यात आली होती. त्यानंतर लगेच शिक्षा म्हणून त्या देशाशी चीनने संबंध जवळजवळ तोडले, ते मागील वर्षी परत स्थापन झाले.

तुरुंगात असताना या मे महिन्यात लिऊला कॅन्सर झाल्याचे लक्षात आले. त्याला उपचारांसाठी विदेशी परवानगी नामंजूर झाली. शेवटी कॅन्सर टोकाला गेल्यावर त्याला हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. तेथेही तो कडक सरकारी देखरेखीत होता, म्हणजे तुरुंगातून नजरकैदेत गेला एवढेच. तेथे १३ जुलैला त्याचे निधन झाले. त्याचा अंत्यसंस्कारही घाईत, गुप्तपणे फक्त निमंत्रित लोकांसमोर झाला. श्रद्धांजलीचे इंटरनेटवरचे सगळे पोस्ट्सतातडीने वगळण्यात आले. चीनमध्ये मीडिया सरकारी नियंत्रणात, तेथेही या मृत्यूचा नाममात्र उल्लेख झाला.

तात्पर्य, जिवंत असताना त्याला गप्प करण्याचा प्रयत्न, मग त्याचा संदेश विस्मरणात ढकलण्याचा प्रयत्न ही महासत्ता करत आहे. एरवी कोणालाही दाद न देणारी व आंतरराष्ट्रीय व्यवहारांत मनमानी करणारी सत्ता एका अहिंसक विरोधकाच्या वैध विरोधाला घाबरली, हे स्पष्ट आहे.

✦

मोसूलचा पाडाव

मोसूल हे लोकसंख्येनुसार इराकमधील दुसऱ्या क्रमांकाचे शहर. ते गेली तीन वर्षे इस्लामिक स्टेटच्या (यापुढे 'स्टेट') ताब्यात होते. ९ महिन्यांच्या घमासान लढाईअखेर ते ९ जुलैला बहुश: इराकी सैन्याच्या ताब्यात आले.

स्टेटच्या भौगोलिक प्रभावक्षेत्राला मोठा धक्का बसला. मोसूलचे यश इराकी सैन्याला अमेरिकेचे हवाई छत्र, मार्गदर्शन व कुर्द सैन्य यांच्या सहकार्याने शक्य झाले. आता रक्का या सिरियातील स्टेटच्या स्वयंघोषित राजधानीसाठी लढाई चालू आहे. रक्का मुक्त झाल्यावर पुढचे चित्र नीट स्पष्ट होईल.

पण मानवी वेदनेचा अंदाज मोसूलनंतर दिसू लागला आहे.

मोसूलची लोकसंख्या लढाईआधी २० लाख. त्यातील निम्मे शहर सोडून गेले. काही हजारात स्टेटने ठार मारले, काहीशे अमेरिकेच्या चुकीच्या हवाई हल्ल्यात बळी पडले. निम्मे शहर बेचिराख आहे. घरोघरी प्रेते कुजत आहेत. परांगदा लोकातील पावणे-सात लाख परतू शकणार नाहीत कारण त्यांची घरेच नष्ट झाली. लेख लिहिण्याच्या वेळी (मध्य-जुलै) जेथे गनिमी काव्याने गल्ली-बोळात स्टेट लढत आहे, तेथील रहिवासी ही स्टेटच्या सैनिकांची सरकारी सैन्याविरुद्ध मानवी 'ढाल' आहे, त्यांना अन्न-पाण्याचे दुर्भिक्ष्य.

वीज, पाणी, रस्ते, पूल, हॉस्पिटल्स, घरे, शाळा - सगळेच पुनर्वसन आता पुढे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार याला एक अब्जाहून अधिक डॉलर्स लागतील. तेलाच्या घसरत्या भावांमुळे इराकी सरकारकडे पैसा नाही. असला तरी त्यांची आजवरची अशा इतर उद्ध्वस्त गावात दिसलेली क्षमता आश्वासक नाही. राष्ट्र-पुनर्निर्माण या प्रयोगात अमेरिकेने अफगाणिस्तान आणि सद्दाम हुसेननंतरच्या इराकमध्ये हात पोळून घेतलेले आहेत. (त्या पोकळीत तर स्टेटचा जन्म झाला आणि सीरियातील यादवीने त्यांचा प्रभाव वाढला.) त्यामुळे संभाव्य कंत्राटातून मिळणाऱ्या पैशाच्या लोभानेही ते या फंदात फारसे पडणार नाहीत.

अमेरिकेला या प्रदेशात निश्चित धोरण नाही, स्टेटला हुसकावून लावणे हे उद्दिष्ट त्यांच्याबरोबर इराकी सरकारचेही होते. पण मोसूलमध्ये ते साध्य झाल्यावर 'नंतर काय' - याचे काहीही नियोजन नाही. अशा काळात दहशतवादाचा पुनर्जन्म होतो हे अफगाणिस्तानमध्ये दिसले आहे.

त्यात इराकमध्ये बरीच गुंतागुंत आहे. शिया-सुन्नी वैर आहेच. इराकच्या आधीच्या पंतप्रधानाच्या शिया राजवटीत सापत्न वागणूक मिळाल्याने स्टेट आपला तारणहार ही सुन्नींची भावना परवा-परवापर्यंत होती. मोसूलमध्ये स्टेटचे स्वागत झाले होते. मग स्थानिक तरुण पिढीतून स्टेटला जास्तीचे सैनिक मिळाले. इराकमध्ये या दोन पंथीयांच्यातील दुष्मनी कमी करण्याचा सरकारचा धोरणात्मक प्रयत्न दिसत नाही. अशा परिस्थितीत इराण-सीरिया या शिया राजवटी ढवळाढवळ करणार. शिवाय कुर्द हा आणखी एक घटक. कुर्द लोकांना स्वतंत्र राष्ट्र हवे आहे. त्याला शिया पंथीयांची संमती नाही आणि तुर्कस्तानही त्याविरुद्ध आहे. ज्या सुन्नी शेजाऱ्यांनी स्टेटला आजवर पाठिंबा दिला, त्यांच्यावरचा सूड हे सुन्नी-सुन्नी वैरही विस्थापितांतील काही परतल्यास उफाळून येणार. मुळात सीरियात जोपर्यंत स्थैर्य नाही, तोपर्यंत इराक स्थिर होणार नाही. पण सीरियाच्या अस्थैर्यात तुर्कस्तान, इराण, रशिया आणि कुर्द यांचे हितसंबंध आहेत.

मोसूलमध्ये पराभव होणार लक्षात आल्यावर बरेच जिहादी दाढी उतरवून, बंदुका टाकून साध्या कपड्यात रहिवाशांच्यात मिसळले किंवा इराक, सीरियाभर आता विखुरले आहेत. संधी मिळताच ते हिंसा सुरू करणार. (त्यांच्या हल्ल्यांची टांगती तलवार कोणत्याच खाजगी गुंतवणूकदारालाही अनुकूल नाही.) 'Sleeper' म्हणून दशतवाद्यांच्यात एक प्रकार असतो. हे निष्ठावंत महिनोंमहिने सुप्त रहातात. ते सामान्य लोकांच्यात रहातात पण वरून आदेश आला की अचानक सक्रिय होतात. या संख्येचा अंदाजही नाही. वर उल्लेखलेले पावणे-सात लाख लोक परतू शकले नाहीतच, तर देशभर आपला संताप पसरवणार.

इराक व सीरियातील इतर अनेक छोटी-मोठी शहरे अजून स्टेटकडे आहेत व मोठा भूप्रदेशही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात शांतता येणे नाही. किंबहुना, आता सरकारच्या ताब्यात असणाऱ्या शहरांमध्ये आतंकवादी हल्ले वाढण्याचीच शक्यता आहे. भूभाग हातातून गेला तरी स्टेटची मधली फळी शाबूत आहे - शस्त्रास्त्रतज्ज्ञ, पैसा हाताळणारे, इंटरनेटतज्ज्ञ, वगैरे. रक्कापासून ११० मैलांवरच्या मायादिन नावाच्या शहरात ते आता मुक्कामी आहेत. शेजारची अनेक गावे त्यांच्या ताब्यात आहेत व काही काळ तरी रहातील. ते कार्यरत रहाणारच.

स्टेटचा विकृत आदर्शवाद - धार्मिक विद्वेष, त्यातून कत्तली, स्त्रीदास्य इ. जगभरच्या तरुण पिढीला आकर्षित करतो. शिवाय या प्रदेशात सुमारे दीड कोटी मुले शालेय शिक्षणापासून वंचित, हिंसाचारात वाढत आहेत, हा जगाला भावी धोका आहे.

एकवेळ स्टेटकडून भूभाग परत मिळवणे बंदुकीच्या जोरावर शक्य आहे पण या भस्मासुराला बंदुकी हे उत्तर नाही. ही लागण आता आफ्रिका, इराण, फिलिपिन्सपर्यंत पसरली आहे.

मोसूलमधील एका रहिवाशाच्या शब्दांत 'स्टेटने मानसिकता रोगट केली तर लढाईने शहरच उद्ध्वस्त केले, किंमत मात्र आम्ही दिली. '

Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com